0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ३१/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५४/२०१२/जा.५३६, दिनांक ०७/०८/२०१२.

३) मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक अतुल लाभुलाल तुरखिया व हमाल रामदयाल रामलाल राजभर यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजीचे संयुक्त लेखी निवेदन.

४) सहाय्यक पोलिस निरिक्षक, काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ०१/१२/२०१२ रोजी प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५४/२०१२/जा. १७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : 03/01/2013.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १७/०७/२०१२ रोजी या कार्यालयास खात्रीलायक खबर मिळाली की, मे. पायोनियर ऑईल कंपनी इंडस्ट्रियल इस्टेट, सुपर प्रोसेसच्या बाजुला, डॉ. आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई ४०००१२ या ठिकाणी विनापरवाना ल्युब ऑईल व इतर ज्वलनशिल पदार्थ साठवले जात आहेत, अशा मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंच व काळाचौकी पोलिस ठाणेच्या अधिपत्त्याखालील पोलिस यांचेसह उक्त ठिकाणी पोहचले. त्यावेळी सदरच्या जागेमध्ये दोन व्यक्ती उपस्थित असल्याचे आणि सदर जागेमध्ये बऱ्याचशा लोखंडी ड्रम्स व कॅन्स (प्लॉस्टिक) ठेवलेल्या असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष आढळले. उपस्थित दोन्ही व्यक्तींना त्यांचे नांवे विचारली असता, त्यापैकी एका व्यक्तीने त्याचे नांव अतुल लाभुभाई तुरखिया असल्याचे सांगून, सदर जागेत सद्या कार्यरत असलेल्या मे. पायोनियर ऑईल कंपनीचे ते मालक असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. दुसऱ्या व्यक्तीने त्याचे नांव रामद्याल रामलाल राजभर

असे सांगून तो मे. पायोनियर ऑईल कंपनीच्या सदर जागेत हमालाचे, माल लोडींग व अनलोडींग करण्याचे काम करीत असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरच्या जागेत ठेवलेल्या लोखंडी ड्रम्स आणि प्लॉस्टिक कॅन्समध्ये असलेल्या ऑईल सदृश्य पदार्थाबाबत चौकशी केली असता, त्यामध्ये ल्युब्रिकेटींग ऑईल व ग्रीस असल्याचे अतुल तुरखिया यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदरच्या ल्युब्रिकेटींग ऑईल व ग्रीसच्या व्यवसायाच्या अनुषंगाने त्याचेकडे उपलब्ध असलेले परवाने, कागदपत्रे इ. बाबत पंचांसमक्ष त्याच्याकडे अधिक सखोल चौकशी करता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १९६४ पासून त्याचेकडे परवाना असल्याचे अतुल तुरखिया याने सांगितले. व्यवसायाच्या परवान्याबाबत अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष चौकशी केली असता, अतुल तुरखिया याने जॉईट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज (एमएमआर), महाराष्ट्र राज्य यांनी दिलेला परवाना क्र. एमएमआर/ल्युब ऑईल ॲण्ड ग्रिस ऑर्डर/०२१२/२००४ दिनांक ०३/०२/२००४ हा दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत वैध असलेला परवाना सादर केला. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरचा परवाना ३५४, नरशी नाथा स्ट्रीट, मुंबई ९ या पत्त्यावरील असल्याचे निदर्शनास आणले आणि घटनास्थळाच्या जागेवर परवाना घेतला आहे काय व असल्यास तो सादर करावा, असे अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याचेकडे विचारणा केली असता, सदर जागेवर जॉईट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज यांचेकडील परवाना नसल्याचे अतुल तुरखिया याने अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. त्यांनतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी असलेल्या ऑईल साठ्याच्या खरेदी-विक्रीबाबतचे साठापुस्तक ठेवण्यात आले किंवा कसे, याबाबत चौकशी केली असता, असे साठापुस्तक ठेवलेले नसल्याचे अतुल तुरखिया याने सांगितले.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर जागेच्या वैधतेबाबत विचारणा केली असता, सदर जागा १९५८ पासून त्याचे वडीलानी भाडेपट्ट्याने घेतली होती व ती वारशाने त्याच्याकडे आली आहे, मात्र त्याबाबत सध्याची भाडेपावती व त्याबाबतची कागदपत्रे सध्या त्याच्याकडे उपलब्ध नसल्याचे अतुल तुरखिया याने सांगितले. सदर जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांना साठवणूकीची परवानगी दिलेली असल्याचे अतुल तुरखिया याने अधिकाऱ्यांना सांगून महानगरपालिकेच्या परवान्याची प्रत पंचांसमक्ष सादर केली. सदरच्या परवान्यावर कोणताही गाळा क्रमांक, प्लाट क्रमांक इत्यादी तत्सम तपशिल नमूद नसल्याचे अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अतुल तुरखिया याचे निदर्शनास आणले. म्हणजेच सदरहू व्यवसाय अनधिकृत जागेत असल्याचे आढळून आले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अतुल लाभुभाई तुरखिया आणि रामदयाळ रामलाल राजभर याच्या समवेत घटनास्थळावरील आढळून आलेल्या ऑईल व ग्रीसच्या साठ्याची प्रत्यक्ष मोजदाद केली असता, खालीलप्रमाणे साठा आढळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एचपी टायसना ग्रीसने पूर्ण भरलेले ४ ड्रम्स | ८०० लिटर | ८०,०००/- |
| २ | एचपी टायसना ग्रीसने अर्ध्यापेक्षा कमी भरलेला ड्रम | ५० लिटर | ५,०००/- |
| ३ | एचपी ईलॅस्टो ऑईलचे ९ ड्रम्स | १८०० लिटर | ९०,०००/- |
| ४ | एचपी एन्क्लो ऑईलचे ३ ड्रम्स | ६०० लिटर | ३०,०००/- |
| ५ | ल्युब ऑईल/इंडस्ट्रियल ऑईलचे पूर्ण भरलेले १६ ड्रम्स | ३२०० लिटर | १,६०,०००/- |
| ६ | ल्युब ऑईल/इंडस्ट्रियल ऑईलच अर्धापेक्षा कमी भरलेला १ ड्रम्स | ५० लिटर | २,५००/- |
| ७ | एचपी जॉबकुल कॅन्सचे १३ कॅन | २६० लिटर | २६,०००/- |
| | | एकूण | ३,९३,५००/- |

वरील साठ्या व्यतिरिक्त घटनास्थळी ९८ लोखंडी रिकामे ड्रम्स व १७ प्लॉस्टिकचे रिकामे ड्रम्स पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना आढळले. आढळून आलेल्या ऑईल साठ्याबाबतच्या खरेदी बिलांची अधिकाऱ्यांनी अतुल तुरखिया याचेकडे पंचांसमक्ष चौकशी केली असता, त्यांनी मे. साई इंडस्ट्रीयल ल्युब्ज, नाशिक यांचेकडील दिनांक ०२/०४/२०१२, १०/०४/२०१२, १४/०५/२०१२ आणि ०७/०७/२०१२ अशी ४ टॅक्स इन्व्हाईसेस अधिकाऱ्यांकडे सादर केली. त्यांचे इन्व्हाईस क्रमांक अनुक्रमे एनएम/३/२०१२-१३, ४७/२०१२-१३, एनएम/५७/२०१२-१३ आणि एनएम/१६१/२०१२-१३ असे असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. वरील चारही इन्व्हाईस अधिकाऱ्यांनी पंचांच्या सहीशिक्क्यानिशी ताब्यात घेतली. तसेच जॉईंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज (एमएमआर), महाराष्ट्र राज्य यांनी मे. पायोनियर ऑईल कंपनी यांना देण्यात आलेला परवाना क्र. एमएमआर/ ल्युब ऑईल अॅण्ड ग्रीस ऑर्डर/०३/२/२००४ दिनांक ०३/०२/२००४ ची मुळ प्रत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला परवाना क्र. ७६१०५२०८७ ची छायाप्रतही अधिकाऱ्यांनी पंचांच्या सहीशिक्क्यानिशी ताब्यात घेतली.

घटनास्थळी आढळून आलेल्या व जप्त करण्यात आलेला ऑईलचा साठा हा पंचांसमक्ष पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असला, तरी सदरचा साठा हलवून पोलिसांकडे देणे जागेच्या व वाहतुकीच्या दृष्टीने व्यवहार्य नसल्याने पोलिसांच्या सांगण्यानुसार व त्यांचे संमतीने तो आहे त्या स्थितीत जैसे थे ठेवण्याच्या हमीवर अतुल तुरखिया यांच्या ताब्यात देण्यात आला.

अशाप्रकारे दिनांक १७/०७/२०१२ रोजी १५:३० वाजण्यापूर्वी गोडावून मालक अतुल लाभुभाई तुरखिया व त्याचा नोकर रामदयाळ रामलाल राजभर यांनी वर नमूद अनधिकृत ठिकाणी ल्युब्रिकंट ऑईलचा साठा करुन

त्याची विक्री केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० तसेच २) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर - १९८७ मधील तरतुदींचा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.गु.नों.क्र. ९७२/२०१२, दिनांक १७/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक अतुल लाभुलाल तुरखिया व हमाल रामदयाल रामलाल राजभर तसेच त्यांचे वतीने ॲड. श्री. महेंद्र महादेव पाटणेकर हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक अतुल लाभुलार्ल तुरखिया व हमाल रामदयाल रामलाल राजभर यांच्या वतीने वाचावे क्र. ३ अन्वये संयुक्त लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

तद्नंतर वाचावे क्र. ५ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit No. 1 contains lubricating oil and Exhibit No. 2 contains grease, असे नमूद केले आहे.

<u>युक्तीवाद</u> :-

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक अतुल लाभुलाल तुरखिया व हमाल रामदयाल रामलाल राजभर यांनी सादर केलेल्या संयुक्त लेखी निवेदनात, फिरते पथकास मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्या अशिलाच्या जागेत धाड टाकली आहे. मे पायोनियर ऑईल कंपनी सुपर प्रोसेसच्या शेजारील इंडस्ट्रियल इस्टेट, डॉ. आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई-१२ यांनी जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३,७,८ व १० सह लुब्रीकंट ग्रीस ऑईल प्रोसेस ॲन्ड सप्लाय, १९८७

अन्वये लुब्रीकंट ऑईल व इतर ज्वलनशील पदार्थाची विनापरवाना साठवणुक केल्याचे नमुद केले. मे. पायोनियर ऑईल कंपनीकडे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील १९६४ पासुनचा वैध परवाना असुन तो दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत विधीग्राहय आहे. साठामालक अतुलभाई तुरखीया यांच्याकडे जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंतर्गत वैध परवाना असुन घटनास्थळी फिरते पथकाने धाड टाकली असता साठा विहीत मर्यादेत आढळून आला आहे. पायोनियर कंपनीकडे उद्योग सहसंचालक यांचेकडील दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत ३५४, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई-०९ या पत्यावरील वैध असलेला परवाना आहे. सदर परवाना हा नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्यावरील असल्याने लुब्रिकंट ऑईलचा साठा तेथे साठवणुक करणे शक्य नसल्याने त्यांना गोडाऊन अथवा वेअरहाऊसची आवश्यकता आहे. सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिले सादर केली आहे. मे. पायोनियर ऑईल कंपनी यांचेकडे विविध वैध परवाने असतांना देखील त्यांच्यावर चुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेला लुब्रिकंट ऑईल हा शासनजमा करण्यात येवू नये असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

सहाय्यक पोलिस निरिक्षक, काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, अटक आरोपी/गोडावून मालक अतुल लाभुभाई तुरकिया याच्याकडे मा. सह संचालक इंडस्ट्रीज (एमएमआर), इंडस्ट्रियल केमिकल लॅबोरेटरी बिल्डिंग, टाटा नगर समोर, व्ही.एन पुरव मार्ग, चुनाभट्टी (पूर्व), मुंबई ४०००२२ यांचा त्यांच्या मालकीच्या मे. पायोनियर ऑईल कंपनीच्या नांवे व्यवसाय परवाना असून अनुज्ञापन खाते, बीएमसी, एफ-दक्षिण, विभाग, परेल, मुंबई यांचा तेलजन्य पदार्थ साठवणूक करण्याचा वैध परवाना असलयाचे निष्पन्न झाले आहे. लायसन्समध्ये मिनेरल ऑईल साठवणूक क्षमता ३०,६८५.२३ किलो, ग्रीस १०८० किलो, सल्फ्युरिक ॲसिड २२५ लिटर्स असून त्यांच्या गोडावूनमध्ये असलेला साठा ६,७६० लिटर्स (मर्यादेपेक्षा कमी) आढळून आला आहे. गोडावून मालकाने गुन्ह्यामध्ये जप्त मालमत्तेसंबंधी अभिलेख/ईव्हॉईस बिले तसेच स्टॉक रजिस्टरची नक्कल प्रत सादर केलेली असून त्याच्याकडे असलेला साठा वैध आणि कायदेशिर आहे. गुन्ह्याच्या तपासादरम्यान वरिष्ठ निरिक्षक, (अनुज्ञापन खाते), एफ-साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई ४०००१२ यांनी श्री. तुरकिया यांच्या लायसन्सबाबत घटनास्थळी भेट देवून अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी, १) लायसन्समध्ये नमुद पत्ता व तेलजन्य पदार्थ साठवणूक करण्याचे ठिकाण एकच असून गोडावून मालक/अटक आरोपी अतुल लाभुभाई तुरकिया यांनी अनधिकृत जागेमध्ये साठा केलेला नाही. त्यांना देण्यात आलेले लायसंन्स दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत शुल्क भरण्यात आले असल्याने वैध आहे. २) अनुज्ञापन धारकाने तेलजन्य पदार्थाचा केलेला साठा हा त्याच्या लायसन्समध्ये उल्लेखित मर्यादेपेक्षा कमी असल्याने लायसन्समधील तरतुदींचे उल्लघंन

केलेले नाही, या बाबींचा उल्लेख केला आहे. अटक आरोपी/गोडावून मालक अतुल लाभुभाई तुरकिया यांच्याकडे त्यांच्या गोडावूनच्या जागेसंबंधी मे. पायोनियर ऑईल कंपनी या नावाने नॅशनल इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या सन १९७२ ते १९७७ या कालावधीतील चार भाडे पावत्या असून त्यामध्ये कोणताही गाळा नंबर नमूद नसुन इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई ४०००१२ असा उल्लेख आहे. यावरुन गोडावूनची जागा ही अनधिकृत नसल्याचे दिसून येते. तपासाच्या अनुषंगाने, मा. सह संचालक इंडस्ट्रिज, मुंबई यांना चौकशी करिता समन्स बजावण्यात आलेले असून त्यांचा अहवाल प्रलंबित आहे, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १७/०७/२०१२ रोजी या कार्यालयास, मे. पायोनियर ऑईल कंपनी इंडस्ट्रियल इस्टेट, सुपर प्रोसेसच्या बाजुला, डॉ. आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई ४०००१२ या ठिकाणी ल्युब ऑईल व इतर ज्वलनशिल पदार्थांची विनापरवाना साठवणुक केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंच व काळाचौकी पोलिस ठाणेच्या अधिपत्याखालील पोलिस यांचेसह उक्त ठिकाणी धाड टाकली असता, नमुद गोदामामध्ये बऱ्याचशा लोखंडी ड्रम्स व कॅन्स (प्लॅस्टिक) ठेवलेल्या असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळुन आले. सदर ठिकाणी उपस्थित इसम नामे अतुल लाभुभाई तुरखिया यांनी सदर जागेत सद्या कार्यरत असलेल्या मे. पायोनियर ऑईल कंपनीचे ते मालक असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी असलेल्या ल्युब्रिकेटींग ऑईल व ग्रीसच्या व्यवसायाकरीता जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३ अन्वये लुब्रिकेटींग ऑईल्स् अॅन्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग, सप्लाय अॅन्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ या आदेशान्वये आवश्यक असणारा परवाना व इतर कागदपत्रे सादर करण्यास सुचित केले असता, उपस्थिताने ३५४, नरशी नाथा स्ट्रीट, मुंबई ९ या वेगळया पत्यावरील जॉईट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज (एमएमआर), महाराष्ट्र राज्य यांनी दिलेला परवाना क्र. एमएमआर/ल्युब ऑईल ॲण्ड ग्रिस ऑर्डर/०२१२/२००४ दिनांक ०३/०२/२००४ हा दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत वैध असलेला परवाना सादर केला. उपस्थित साठामालक हे नमुद गोदामावर ल्युब्रिकेटींग ऑईलची साठवणुक करुन व्यवसाय करीत असल्याने त्यांनी सदरच्या गोदामावर परवाना घेतला आहे किंवा कसे ? याबाबत विचारणा केली असता, सदर जागेवर जॉईट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज यांचेकडील परवाना

नसल्याचे अतुल तुरखिया याने पंचांसमक्ष कबुल केले आहे. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदर गोदामातील ऑईल व ग्रिसचा साठा हा विनापरवाना व अवैध साठवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळावर ऑईल व ग्रीसच्या साठ्याची प्रत्यक्ष मोजदाद करुन, ५ ड्रम मधील ८५० लिटर ग्रिस, २९ ड्रम मधील ५६५० लिटर व १३ कॅनमधील २६० लिटर ऑईल असे मिळून एकुण ३,९३,५००/- एवढया किमतीचा मुद्देमाल जागीच जप्त करुन संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० तसेच २) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर - १९८७ मधील तरतुदींचा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.गु.नों.क्र. ९७२/२०१२, दिनांक १७/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण ३,९३,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंतर्गत या विभागाकडून अथवा पोलिस पथकाकडून करण्यात येणाऱ्या कारवाईमध्ये पुढील सखोल तपास होणे गरजेचे असते. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांना सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस अनुपस्थित राहिले. सदर गुन्हा नोंद प्रकरणी कारवाईच्या वेळी घटनास्थळी काळाचौकी पोलिस ठाणे येथील पोलिस पथक उपस्थित होते. सदर कारवाईच्या वेळी मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांना लुब्रिकेटींग ऑईल व ग्रिस या पेट्रोलियम पदार्थाच्या खरेदी साठवणुक व विक्री करीता आवश्यक असणारा उद्योग सहसंचालक या विभागाकडील परवाना सादर करण्यास सुचित केले असता, कंपनीच्या मालकाने ३५४, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई - ०९ या वेगळया पत्यावरील परवाना पंचांसमक्ष सादर केला. सदर परवान्यावर घटनास्थळी असलेल्या गोदामाची नोंद आढळून आलेली नाही. लुब्रिकेटींग ऑईल अथवा कोणतेही पेट्रोलियम पदार्थ हे जीवनावश्यक वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याने सदर साठयाच्या खरेदी, साठवणुक व विक्री करीता जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३ अन्वये अंमलात असलेल्या लुब्रिकेटींग ऑईल्स ॲन्ड ग्रीस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲन्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ अन्वये साठवणुकीच्या ठिकाणी परवाना धारण करणे बंधनकारक आहे. तथापी, पथकास नमुद गोडाऊनमध्ये मे. पायोनियर ऑईल कंपनी यांनी उपरोक्त परवाना धारण केला नसल्याने सदर ठिकाणी साठवणुक असलेला संपुर्ण पेट्रोलियम पदार्थाचा साठा हा विनापरवाना आढळून आल्याने शासनाचे वतीने कारवाई करण्यात आली आहे. सदर बाब मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात तसेच सुनावणीच्या वेळीही कबुल केली आहे. ही बाब नमुद करावीशी वाटते. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तपासी पोलिस अधिकारी यांनी जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ तसेच लुब्रिकेटींग ऑईल्स् ॲन्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲन्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ या

आदेशाचा परीपूर्ण अभ्यास करुन अभिवेदन सादर न करता त्यांनी केवळ इतर प्राधिकरणाकडील परवान्यांची यादी सादर करुन जीवनावश्यक वस्तु असलेल्या पेट्रोलियम पदार्थाकरीता आवश्यक परवाना धारण न केल्याच्या बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केल्याची बाब ही साशंकता निर्माण करणारी आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. पायोनियर ऑईल कंपनीच्या नावे <u>३५४ नरसी नाथा स्ट्रिट, मुंबई - ०९</u> या पत्यावरील लुब्रिकेटींग ऑईल्स व ग्रीस याच्या व्यवसायासाठी उद्योग सहसंचालक, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या परवानाचे अवलोकन करता सदर परवानाच्या पहिल्या परिच्छेदात **"Licence to carry on the business of processors (Only for the activity of sale) is hereby granted to the party at the place and subject to the terms and conditions below and provisions of the Lubricating Oils and Grease (Processing, Supply and Distribution Regulation) Order, 1987"** असे नमुद आहे. म्हणजेच परवानाधारकास परवानावरील नमुद पत्यावर व्यवसाय करण्यास परवानगी आहे. तथापी, मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांनी साठवणुक केलेल्या गोदामाचा पत्ता त्यांनी परवानावर नमुद करुन घेतला नाही. यावरुन त्यांनी नमुद गोदामावर केलेली साठवणुक ही अवैध व विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे. सुनावणीचेवेळी साठामालक अतुल तुरखीया यांनी नमुद गोदामावर परवाना घेतला नसल्याचे अथवा त्यांच्याकडील असलेल्या इतर पत्यावरील परवान्यावर त्यांनी नमुद गोदामाची नोंद करुन घेतले नसल्याचे मान्य केले आहे.

दि लुब्रिकेटींग ऑईल्स् ॲन्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲन्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ चे कलम २(सी) मध्ये प्रोसेसरच्या व्याख्येमध्ये लुब्रिकेटींग ऑईल ॲन्ड ग्रिस च्या प्रोसेसिंग, मॅन्युफॅक्चरिंग, ब्लेंडींग, कंपाऊंडींग, पॅकेजींग, रिफायनींग अथवा रि-रिफायनींग किंवा विक्रीची प्रक्रिया विषद केली आहे. कलम ३ अन्वये कोणत्याही व्यक्तिस प्रोसेसिंगच्या व्यवसायाकरीता परवाना धारण करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तसेच सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता कलम ५(१) अन्वये नमुना १ मध्ये अर्ज करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तथापी, मे पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, त्यांनी नमुद गोदामावर परवाना धारण केला नसुन तसेच त्याकरीता त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे अर्जही सादर न केल्याचे दिसुन येते. मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांनी मे. साई इंडस्ट्रियल ल्युब्स् तसेच मे. इंडिया ऑईल डिस्ट्रिब्युटर्स यांचेकडून पेट्रोलियम पदार्थ खरेदी केल्याची खरेदी बिले सादर केली असुन सदर खरेदी बिलांवर खरेदीदार म्हणुन मे. पायोनियर ऑईल कंपनी असे नमुद असुन त्यावरील पत्ता ३५४, नरसी नाथा स्ट्रिट, मुंबई - ०९ असे नमुद आहे. म्हणजेच सदर आस्थापनांनी नमुद साठयाची विक्री करुन तो साठा मे. पायोनियर ऑईल कंपनी यांना बिलावरील नमुद पत्यावर पुरवठा केल्याचे दिसुन येते. यावरुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला लुब्रिकेटींग

RATIONING & DIR... HEAD... MUMBAI

ऑईल व ग्रीसचा साठा हा सादर केलेल्या खरेदी बिलांवरचा नसुन तो विनाखरेदी बिलांचा गैरमार्गाने प्राप्त केलेला अवैध साठा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. वरील नमुद कागदपत्रांव्यतिरीक्त मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक यांनी इतर कोणतेही आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर केल्याचे दिसुन येत नाही. म्हणजेच त्यांनी मोघम स्वरुपाचे निवेदन व त्यासोबत अपुर्ण कागदपत्रे सादर करुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते. सबब, जप्त करण्यात आलेला संपुर्ण ऑईल व ग्रिसचा विनापरवाना व विनाखरेदी बिलांचा अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ९७२/२०१२, दिनांक १७/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या पुर्ण भरलेल्या २८ ड्रममधील ५६०० लिटर ऑईल, १ ड्रममधील ५० लिटर ऑईल तसेच १३ कॅनमधील २६० लिटर ऑईल असे मिळुन एकुण ५९१० लिटर्स ऑईलचा संपुर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या पुर्ण भरलेल्या ४ ड्रममधील ८०० लिटर ग्रीस व १ ड्रममधील ५० लिटर ग्रीस असे मिळुन एकुण ८५० लिटर्स ग्रीसचा संपुर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेचे रिकामे होणारे ३४ ड्रम्स व १३ कॅन इ. साहित्याची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary,

Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai)
यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. पायोनियर ऑईल कंपनीचे मालक अतुल लाभुभाई तुरखिया
२) रामद्याल रामलाल राजभर, हमाल
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.